| | |
|---|---|
| **MHAU050014692024** | **फौ.किरकोळ अर्ज.क्र. १७६/२०२४**<br>वैशाली विकी शेलार<br>**विरुध्द**<br>विकी बाबासाहेब शेलार व इतर |

## अंतरिम पोटगी अर्ज निशाणी ०६ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कौंटुबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम २३ प्रमाणे गैरअर्जदाराकडुन अंतरिम संरक्षण व अंतरिम पोटगी मिळावी यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरती दाखल केलेल्या जबाबाचे अवलोकन केले. अर्जदारातर्फे विव्दान वकील श्री. आर. के. गायकवाड यांचा युक्तिवाद ऐकला. निशाणी क्र.१ वरील आदेश दि. १३.११.२०२४ रोजी गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांच्याविरुध्द विना म्हणणे आदेश पारीत करण्यात आला.

३. अर्जदाराच्या वतीने करण्यात आलेली कथने विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज निकाली काढते वेळी खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने गैरअर्जदारांनी तिच्यावर वेळोवेळी कौंटुबिक हिंसाचार केला हे सिध्द करते काय ? | **होकारार्थी.** |
| २. | अर्जदार ही कौंटुबिक हिंसाचार कायदा कलम २३ नुसार गैरअर्जदारकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरते काय ? | **होकारार्थी.** |
| ३. | अर्जदार ही गैरअर्जदार यांनी तिला राहत त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे हिंसात्मक कृत्य करू नये अशी अंतरिम दाद मिळण्यास पात्र ठरते काय ? | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करीताः–**

**४.** अर्जदाराने अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी निशाणी ३ नुसार स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. याव्यतिरिक्त अर्जदाराने निशाणी ४ वरील यादीसोबत अर्जदाराचे आधार कार्ड व लग्नपत्रीकेची स्कॅन प्रत, तसेच अर्जामधील कथनांच्या पृष्ठ्यर्थ शपथपत्र व मालमत्ता व दायित्त्व प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहेत.

**५.** अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह हिंदू धर्म रितीरिवाजाप्रमाणे दि. ०७.०३.२०२१ रोजी वैजापूर, मोंढा मार्केट, ता. वैजापुर येथे संपन्न झाला. अर्जदार यांच्या आईवडीलांनी विवाहामध्ये गैरअर्जदार यांस संसारपयोगी वस्तू तसेच सोफा, पलंग, कपाट, भांडे व सोन्याची अंगठी व इतर मौल्यवान दागिने दिले आहेत.

**६.** अर्जदाराचे पुढे असे कथन असे की, अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांच्यामधील नातेसंबंध आजतागायत कायम आहेत. गैरअर्जदार क्र. २ ते ११ ही गैरअर्जदार क्र.१ यांचे नातेवाईक आहेत. लग्न झाल्यानंतर अर्जदार ही राहूरी, ता. राहूरी येथे नांदण्यास गेली. तेथे २ ते ३ महिने गैरअर्जदारांनी तिला व्यवस्थीत नांदवले. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारावर संशय घेवून सतत तिला मारहाण करत असे. तसेच गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा छोट्या छोट्या घरगुती कारणावरुन मारहाण व शिवीगाळ करुन मानसिक व शारिरीक छळ केला. गैरअर्जदार हे संगनमत करुन अर्जदार हीस त्रास देत असे व अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्या संसारामध्ये ढवळाढवळ करण्याचे काम करत असे. तसेच अर्जदाराची चुलत नणंद व दिर गैरअर्जदार क्र.१ चे कान भरत असे तसेच अर्जदाराच्या सासु सास–याला अर्जदाराविषयी एकाचे दोन सांगत असे. त्यानंतर दि. २७.०५.२०२४ रोजी गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी मारहाण केली. अर्जदाराने तिच्यावर होत असलेल्या

अत्याचार सहनशिलता संपल्यावर अर्जदाराने तिच्या माहेरी दि. २७.०५.२०२४ रोजी फोन करून सांगितले असता त्याच दिवशी अर्जदाराची आई व मावशी अर्जदाराच्या सासरी गेले. त्यावेळी गैरअर्जदारांनी संगनमत करून अर्जदार व तिच्या आई व मावशीला लाथाबुक्यांनी व दगडाने मारहाण केली. तसेच गैरअर्जदारांनी अर्जदारास धमकावले की, तुम्ही पुन्हा आला तर तुम्हाला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली. तेव्हापासुन अर्जदार ही आईवडीलांच्या घराजवळ भाडयाने रूम घेवून राहत आहे. गैरअर्जदाराने आजपर्यंत त्यांच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी पार पाडलेली नाही.

७. अर्जदाराचे पुढे कथन असे की, अर्जदार स्वत:चे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे. याउलट, गैरअर्जदार क्र.१ हा रिक्षा चालक असून त्यापासून त्याला दरमहा रु.३०,०००/– मिळतात. एकंदरीत गैरअर्जदारांची आर्थिक परिस्थिती अतिशय सधन असुन त्यांना अर्जदारांच्या जबाबदारीव्यतिरिक्त कोणाचीही जबाबदारी नाही. करिता, अर्जदाराने प्रस्तुत अर्ज गैरअर्जदार क्र.१ याच्याकडुन घरभाडे, अन्न वस्त्र आणि वैदयकिय खर्चासाठी दरमहा रुपये रु.५,०००/– अंतरीम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

८. गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी प्रकरणात हजर होऊन देखील त्यांचा लेखी जबाब सादर केलेला नाही, त्यामुळे त्यांच्याविरुध्द विनाजबाब आदेश पारीत करण्यात आला. अर्जदारांची अर्जातील कथने विनाआव्हानीत राहिलेली आहेत.

९. सदरची स्टेज प्राथमिक असल्यामुळे अंतरिम पोटगी मिळणेसाठी अर्जदार यांनी प्रथम दर्शनी तिच्यावर गैरअर्जदार यांचेकडुन कौटुंबिक हिंसाचार झाला हे सिध्द करणे आवश्यक आहे. सदरील बाब सिध्द करणेसाठी अर्जदार यांनी तिच्या मुळ अर्जात व अंतरिम पोटगी मिळणेसाठीच्या अर्जात गैरअर्जदार यांचेविरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप प्रतिज्ञापत्रावर केलेले आहेत. सदरील कथने अर्जदार यांचेवर कौटुंबिक हिंसाचार सिध्द करणेसाठी प्रथमदर्शनी पुरेसे आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी अर्जात केलेल्या कथनानुसार व अभिलेखावर दाखल केलेल्या

कागदपत्रांवरुन अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झाला ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होत आहे.

**१०.** अर्जदार यांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे प्रथमदर्शनी दाखवल्यामुळे ती कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत विविध फायदे (Reliefs) मिळण्यास पात्र ठरते. सदरील अंतरिम अर्जाद्वारे अर्जदार हिने गैरअर्जदार यांचेकडुन दरमहा ५,०००/– रुपयांची अंतरिम पोटगी मागीतलेली आहे.

**११.** अंतरिम पोटगी मंजुर करतेवेळी अर्जदार व गैरअर्जदार यांची आर्थीक परिस्थिती ही भुमिका पार पाडत असते. अर्जदार हीने अर्जात नमुद केले आहे की, ती पुर्णपणे गैरअर्जदारावर अवलंबुन आहे. ती तीच्या आईवडीलांजवळ भाडयाने रूम घेवून राहते. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच अर्जदाराने तिचे अंतरीम पोटगीच्या अर्जात नमुद केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा रिक्षा चालक असून त्यापासून त्याला दरमहा रु.३०,०००/– मिळतात, अशी कथने अर्जदाराने केलेली आहे; परंतु गैरअर्जदार क्र.१ याच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**१२.** प्रस्तुत प्रकरणातील मुळ अर्जाचा निकाल लागण्यासाठी बराचसा कालावधी जाणार आहे. अर्जदार हिस वेळोवेळी प्रकरणाच्या चौकशीसाठी न्यायालयात हजर रहावे लागणार आहे. तिला वकील फी व जाणे–येण्याचा खर्च सोसावा लागेल, तसेच दरम्यानच्या काळात तिला तिच्या आई–वडील यांच्या आश्रयाने जीवन व्यतीत करावे लागणार आहे. त्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदार यांचेकडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे वरील विवेचनाचा विचार करता गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिस मागणी केल्याप्रमाणे घरभाडे, अन्न वस्त्र आणि वैदयकिय खर्चासाठी प्रति महिना ५,०००/– रु. (रुपये पाच हजार मात्र) अंतरिम पोटगी देणे न्यायसंगत होईल. करीता मी मुद्दा क्र.१ व २ यांचे उत्तर होकारार्थी नोंदवित आहेत.

**<u>मुद्दा क्र.३ करीताः</u>**

**१३.** अर्जदार हिने गैरअर्जदार हे ती राहते त्याठिकाणी येवून हिंसात्मक कृत्य करू नये अशी अंतरीम दाद मागितलेली आहे. परंतु प्रस्तुतचा अर्ज व मुळ अर्जाचे अवलोकन केले असता तशा आशयाचे कोणतेही कथन अर्जदाराचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुतची दाद नामंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, मी मुद्दा क्र.३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीताः</u>**

**१४.** मुद्दा क्र.१ व २ च्या उत्तरादखल अर्जदार हे गैरअर्जदाराकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरलेली आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, मी मुद्दा क्र.४ चे उत्तरादाखल पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदारा क्र.१ यांनी मुळ अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून अर्जदार हिस घरभाडे, अन्न वस्त्र आणि वैदयकिय खर्चासाठी प्रति महिना ५,०००/– रु. (रुपये पाच हजार मात्र) अंतरिम पोटगी द्यावी.

३) गैरअर्जदारा क्र.१ याने प्रतीमहा रु. ५,०००/– (रुपये पाच हजार मात्र) रक्कम अर्जदारांना हमदस्त द्यावी किंवा न्यायालयात जमा करावी.

४) या आदेशाची प्रमाणीत प्रत अर्जदाराला मोफत देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by KALE NILESH SUDAM
Date: 2026.01.14 17:20:47 +0530

**दिनांकः** १४.०१.२०२६.　　　　( एन.एस. काळे )
**वैजापूर.**　　　　**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वैजापूर.**